**कथा लेखन स्पर्धेत चे नियम व अटी :**

1. कथा लेखन स्पर्धेसाठी प्रत्येक केंद्रातून एक शिक्षक सहभागी होऊ शकतो.

2. कथा लेखनाच्या तालुकास्तरावर स्पर्धा होतील. प्रत्येक तालुक्यातून एका स्पर्धकाची निवड विभाग स्तरीय स्पर्धेसाठी होईल.

3. विभाग स्तरीय स्पर्धेमधून पाच स्पर्धकांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी होईल..

4. कथा लेखनाची भाषा ही मराठी असावी.

5. कथा सामाजिक संदेश देणारी असावी.

6. कथा पूर्णतः स्वलिखित असावी

7. कथा पूर्वप्रकाशित नसावी

8. कथालेखनासाठी शब्द मर्यादा 500 ते 700 पर्यंत असावी

9. कथेला समर्पक आणि नाविन्यपूर्ण शीर्षक असावे.

10. कथालेखन स्पर्धेसाठी परीक्षक लेखक, कथाकथनकार, नाट्यकलाकार, पत्रकार, निवेदक अशा क्षेत्रातील नामवंत व्यक्ती असावेत.

11. लघुकथा, दंतकथा, प्रेरणादायी कथा, विनोदी कथा, विज्ञान कथा, बालकथा या प्रकारातील कथा असू शकतात.

12. कथा लेखनामध्ये राजकीय पक्ष, जात, धर्म, भाषा, इत्यादी बाबत आक्षेपार्ह लिखाण असू नये.

13. कथा स्व लिखित असल्याबाबत प्रत्येक स्पर्धकाने हमीपत्र सादर करावे.

14. स्पर्धकांनी कॉपीराईट कायद्याचे पालन करावे.

15. कथा युनिकोड मध्ये फॉन्ट साईट 12 असावी.

16. दोन ओळीतील अंतर 1.5 असावे.

17. कथा लेखन स्पर्धा खालील प्रमाणे तीन स्तरावर आयोजित करण्यात यावी. अ. तालुका स्तर स्पर्धा माहे नोव्हेंबर 2025 (चौथा शुक्रवार)

अ. तालुका स्तर स्पर्धा माहे नोव्हेंबर 2025 (चौथा शुक्रवार)

ब. विभाग स्तर स्पर्धा डिसेंबर 2025 (चौथा शुक्रवार)

क. राज्यस्तर स्पर्धा जानेवरी 2026 (चौथा शुक्रवार)

18. मूल्यमापनाचे निकष पुढीलप्रमाणे असतील.

| निकष | कथा विषयाची सुसंगती | सर्जनशीलता व कल्पकता | भाषा आणि शैली | पात्रांची निर्मिती त्यांचा विकास | संवाद व वर्णण शैली | कथानकांची रचना | भावनिक गुंतवणूक | निनीमूल्ये आणि सामाजिक संदेश | मौलिकता | शब्द मर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |

19. विभाग स्तरावर प्रथम पाच क्रमांकाचे विजेते राज्यस्तरावर सहभागासाठी पात्र राहतील. विभागीय डायट ने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी प्रथम पांच क्रमांकाची नावे व त्यांच्या कथा या कार्यालयाकडे कळवावे, जेणेकरून राज्यस्तरीय स्पर्धेचे नियोजन करणे सोयीचे होईल.

20. राज्य स्तरीय स्पर्धेचे नियोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूर जिल्हा सोलापूर यांच्या मार्फत करण्यात येईल.